# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. परदेशी शिष्यवृत्ती योजना/शिष्यवृत्ती/२०२२-२३/1997 दिनांक : ०८.०७.२०२२

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
 सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
 टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
 पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२२-२३ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज स्वीकृतीच्या मुदतवाढीबाबत...**

संदर्भ : - मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/८८ दि. ७ जुलै, २०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा दि. ४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रक्रीया संचालनालयाच्या https://foreignscholarship2022dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक ८ जुलै, २०२२ सायंकाळी ५ वाजेपर्यंत होती. तसेच Online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रती दिनांक ११ जुलै, २०२२ सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावयाची होती.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संदर्भिय पत्रानुसार सदरची मुदत वाढवून आता, उमेदवारांनी Online पध्दतीने अर्ज भरण्यासाठीची मुदत **दिनांक २२ जुलै, २०२२** अशी करण्यात आली आहे. **विद्यार्थ्यांनी Online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयात दिनांक २२ जुलै, २०२२ सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत.** तरी सर्व महाविद्यालय/ विद्यापीठ / संस्थांनी विद्यार्थ्यांना याबाबत सूचना देण्यात याव्यात.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

२. डॉ. अभय वाघ, तंत्रशिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४००००१. यांना माहितीस्तव सादर.